


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १६९ ●गुरूवार, दि. १८ सप्टेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये
● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955



# बीडच्या जनतेच्या स्वप्नपूर्तीचा ऐतिहासिक दिवस : मुख्यमंत्री

## अमळनेर (भां) ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ

**बीड । प्रतिनिधी**

**अनेक दशकांपासून बीडच्या जनतेने प्रतीक्षा केलेली रेल्वे आज बीड येथून सुरू झाली असून, बीडकरांना ऐतिहासिक भेट देत रेल्वेचे स्वप्न पूर्ण झाल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी दिवंगत गोपीनाथराव मुंडे, केशरकाकू क्षीरसागर यांचा मोठा वाटा असल्याचेही त्यांनी सांगितले.**



अमळनेर (भां) ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रेल्वेला हिरवा झेंडा दाखवून केला. यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे, खासदार रजनी पाटील, खासदार बजरंग सोनवणे, आमदार सर्वश्री विक्रम काळे, धनंजय मुंडे, विजयसिंह पंडित, आमदार श्रीमती नमिता मुंदडा, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, मध्य रेल्वे महाप्रबंधक धर्मवीर मीणा, विभागीय रेल्वे प्रबंधक राजेशकुमार वर्मा आदी उपस्थित होते.



### ● आजचा दिवस श्रेयवादाचा नसून आनंदाचा

रेल्वे संघर्ष समितीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आज हा दिवस शक्य झाल्याचे सांगुन मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, हा दिवस श्रेयवादाचा नसून आनंदाचा आहे. बीडमध्ये रेल्वे सुरू होणे म्हणजे फक्त गाडी पोहोचणे नव्हे तर विकासाची वाहिनी पोहोचणे आहे. सन २०१४ नंतर आमच्या सरकारने या प्रकल्पाला गती दिली. केंद्र व राज्याने ५० टक्के हिस्सा देत प्रकल्प ▶▶ उर्वरित पान २ वर

### ●मराठवाड्यातील दुष्काळ संपवण्यासाठी वचनबद्ध

मराठवाडा मुक्ती दिन आणि रेल्वे प्रकल्पाचा आनंद दुहेरी असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गेल्या दहा वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठवाड्यासाठी रेल्वे प्रकल्पांना तब्बल २१ हजार कोटी रुपये दिले. ज्यामुळे विकासाच्या दिशा खुल्या झाल्या. सरकार मराठवाड्यातील दुष्काळ संपवण्यासाठी वचनबद्ध असून, पाण्याचे जाळे निर्माण करण्यासाठी कृष्णा व उल्हास खोऱ्यातील पाणी आणण्याचे मोठे प्रकल्प राबवले जातील. असे त्यांनी सांगितले.

### ● बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हेच आपले ध्येय



उपमुख्यमंत्री श्री. पवार यावेळी म्हणाले की, आता जनतेचे प्रश्न सोडवायाचे आहेत. ३० ते ३५ वर्षानी रेल्वेचे हे काम झाले आहे. या कामासाठी विलंब झाला आहे. यासाठी आत्मचिंतन करण्याची गरज आहे. पुर्वीचा काळ व आजचा काळ यामध्ये मोठा फरक आहे. आज कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर होत आहे. ही रेल्वे पुणे आणि पुढे मुंबई पर्यंत घेवून जाण्यासाठी आपण प्रयत्नशिल आहोत. जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघातील कोणतीही विकास कामे अडणार नाही याकडे लक्ष देण्यात येईल. रेल्वेचे स्वप्न पूर्ण झाले असून आता विमानतळाकडे आपले लक्ष आहे. जिल्ह्यात उद्योगपती आल्यास उद्योग स्थापन करुन रोजगार उपलब्ध होतील. बीडमधील गोरगरिबांना उपचारासाठी मुंबई–पुण्याला जाण्याची आवश्यकता पडणार नाही. यासाठी येथेच आरोग्याच्या चांगल्या सुविधा निर्माण करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### ● राष्ट्रीय महामार्गासाठी सुमारे १० हजार कोटी रुपये निधी

मंत्री श्रीमती पंकजा मुंडे म्हणाल्या की, बीड येथे रेल्वेसाठी सर्व लोकप्रतिनीधीनी पुढाकार घेतला. रेल्वे ही नागरिकांच्या उन्नतीसाठी असणे आवश्यक आहे. विलासराव देशमुख आणि गोपीनाथराव मुंडे यांनी मराठवाड्यात रेल्वे आली पाहिजे यासाठी पुढाकार घेतला. बीड जिल्हा कष्टकऱ्यांचा आणि स्वाभिमानी लोकांचा आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जिल्ह्यातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गासाठी सुमारे १० हजार कोटी रुपये निधी दिला. बीडला रेल्वे यावी यासाठी अनेकांनी आपले योगदान दिले. जिल्ह्याच्या विकासासाठी आपलेही योगदान देण्याची तयारी आहे. जिल्ह्यावर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी कृपादृष्टी ठेवावी अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

# "बाप्पा तुम्ही खूप भाग्यवान, नांगरलं कुणी, पेरलं कुणी अन्..."; पंकजा मुंडेंचा खासदार बजरंग सोनवणेंना टोला

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या ४० वर्षांपासून रखडलेले बीडकरांचे रेल्वेचे स्वप्न आज अखेर पूर्ण झालं. बीड जिल्ह्यातील रेल्वे स्थानकाचं लोकार्पण करण्यात आलं. या कार्यक्रमासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पंकजा मुंडे यांच्यासह स्थानिक आमदार, खासदार उपस्थित होते. यावेळी मंत्री पंकजा मुंडे यांनी बीडच्या विकासकामांवरुन ▶▶ उर्वरित पान २ वर



### ● अजितदादा तुम्ही बीडमध्ये या: पंकजा मुंडे

दादांच्या कामाचा सपाटा सर्वांनाच माहिती आहे. त्यांची पद्धतही माहिती आहे. दादा तुम्ही बीड जिल्ह्यात दर आठवड्याला या सर्वांना सकाळी लवकर उठायची सवय लागेल. दादा तुमच्याप्रमाणे मी देखील थोडं थोडं केलं. मी पण आज सकाळी ७ वाजता पूरग्रस्तांसाठी दौरा केला. जर आपण असेच पुढे गेलो तर या जिल्ह्याच्या विकासाला कुठेही गालबोट लागणार नाही, असे पंकजा मुंडें म्हणाल्या.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामुळे ग्रामीण विकासाला नवसंजीवनी मिळणार

**● उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांचे प्रतिपादन ; काकडहिरा येथून पंचायतराज अभियानाचा शुभारंभ**




**बीड । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान म्हणजे गावोगावी सर्वांगीण विकासाला नवी दिशा देणारी आणि स्पर्धात्मक विकासाला चालना देणारी एक मोठी लोकचळवळ आहे. या अभियाना मुळे ग्रामीण विकासाला नवसंजीवनी मिळणार आहे, ▶▶ उर्वरित पान २ वर

# सर्पदंशाने पहिलीत शिकणाऱ्या आठ वर्षीय मुलीचा मृत्यू



**किल्लेधारुर । प्रतिनिधी**

तालुक्यातील पहाडी दहीफळ येथे सर्पदंशामुळे एका चिमुरडीचा दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना मंगळवार (दि.१६) रोजी समोर आली. ज्ञानेश्वरी हरीभाऊ नागरगोजे (वय ८) असे मृत मुलीचे नाव आहे. ज्ञानेश्वरी ही पहिलीच्या वर्गात शिक्षण घेत होती. अचानक झालेल्या या घटनेने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. सोमवारी पहाटेच्या सुमारास ज्ञानेश्वरी ही आपल्या शेतातील घरात झोपलेली असताना विषारी सर्पाने तिच्या अंगावर डंख केला. काही वेळानंतर मुलगी वेदनेने तडफडू लागल्याने ▶▶ उर्वरित पान २ वर

# खा.सोनवणे म्हणाले, रेल्वेची स्वप्नपुर्ती होतेय आता पाणी द्या, अन् फडणवीसांकडून दुष्काळमुक्तीचा शब्द

## रेल्वे मार्ग उद्घाटन अन् रेल्वे शुभारंभ प्रसंगी खा.सोनवणेंचे धडाकेबाज भाषण

**बीड । प्रतिनिधी**

बीडला रेल्वे यावी, यासाठी बीड जिल्हा रेल्वे कृती समिती आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी काम केले. अनेक वर्ष रेल्वेसाठी संघर्ष सुरू राहिला. दरम्यान, बीड रेल्वेचे स्वप्न आज पुर्ण होत आहे. आज अहिल्यानगर ते बीड रेल्वे सुरू झाली असून बीड ते परळीपर्यंत कामही गतीने सुरू आहे. रेल्वेची स्वप्नपुर्ती होतेय, मुख्यमंत्रीसाहेब आता बीडला २५ टिएमसी पाणी द्या, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे



यांनी केले. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात मराठवाडा दुष्काळमुक्त करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, बीडलाही पाणी आणू, असा शब्द यावेळी दिला. बीड येथील रेल्वे स्थानक येथे अंमळनेर ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपिठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री पंकजा मुंडे, ▶▶ उर्वरित पान २ वर



*महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन विभागाच्या महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्री नामदार पंकजाताई मुंडे या बीड येथे रेल्वे उद्घाटनाच्या निमित्ताने बीड जिल्ह्यामध्ये आल्या असता तसेच बीड शहरांमध्ये डॉक्टर हंगे यांच्या दवाखान्याच्या उद्घाटनानिमित्त बीड शहरांमध्ये आल्या आसता त्यांची नगरसेवक विनोद मुळूक यांच्या निवासस्थानी भेट घेतली व त्यांचे महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने स्वागत करण्यात आले या वेळी पत्रकार संघाचे मा संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य तसेच भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा अध्यक्ष शंकर भाऊ देशमुख तसेच भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे नवनाथ अण्णा शिराळे पाटील सह उपस्थित असलेले भारतीय पार्टीचे गणेश लांडे पाटील सह उपस्थित असलेले महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक तथा दैनिक न्याय टाइम्स पत्रकार संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर सह मान्यवर मोठ्या उपस्थित होते.*

# आ.सुरेश धस यांनी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिला बांधावर जाऊन दिलासा

**आष्टी । प्रतिनिधी**

रविवारी सोमवारी झालेल्या अतिवृष्टीमुळे आष्टी तालुक्यातील अनेक गावातील शेतकरी नागरिकांना तडाखा दिला असून पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. या भागातील नुकसानग्रस्त भागाचा दौरा करून आमदार सुरेश धस यांनी शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष बांधावर जाऊन त्यांना धीर देत अश्रू पुसण्यासाठी प्राधान्य दिले



आहे. विविध ठिकाणी झालेल्या नुकसानीची पाहणी करून त्यांनी तहसीलदार आणि तालुका कृषी अधिकारी यांना सोबत घेऊन तात्काळ पंचनामे आणि नुकसान भरपाई देण्यासाठी कारवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. आज सकाळपासून आमदार सुरेश धस यांनी आष्टी तालुक्यातील धनगरवाडी, कापशी, पांगरा, खडकवाडी, वनवेवाडी, पाटसरा, सुरुडी, धामणगाव, दादेगाव, घाटपिंपरी, देवळाली, खलाटवाडी, डोंगरगांव यासह आदी ठिकाणी शेतकऱ्यांच्या दोन दिवसातील अतिवृष्टीने नुकसान झाले आहे त्या ठिकाणी चिखल असल्यामुळे जमिनीवर चालता येत नसल्यामुळे त्यांनी ट्रॅक्टरच्या हेळक्यावर बसून या भागातील नुकसान झालेल्या भागाची पाहणी केली. ▶▶ उर्वरित पान २ वर

**● मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस बीड जिल्ह्यात येत आहेत त्यामुळे त्यांच्या कार्यक्रमास उपस्थित राहणे आवश्यक होते परंतु आष्टी तालुक्यातील अनेक गावातून शेतकऱ्यांचे आलेले फोन आणि लोकांचा दिसलेला आक्रोश तसेच शेतकऱ्यांना शासनाकडून असलेली मदतीची अपेक्षा यामुळे लोकप्रतिनिधी म्हणून मला तिकडे जावे लागले आणि मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमाला रेल्वेच्या उद्घाटनाला जाताना आले नाही याबद्दल वाईट वाटत आहे परंतु त्याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांना कळवले आणि त्याचवेळी शेतकऱ्यांच्या वेदना जाणून घेतल्या– सुरेश धस, आमदार आष्टी**



# पशुपालनास कृषी समकक्ष दर्जा – ऐतिहासिक निर्णय घेणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य

पशुपालन व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाला कृषी समकक्ष दर्जा देण्याची अनेक पशुपालकांबरोबरच राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आग्रही मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांनी या मागणीला सकारात्मक पाठिंबा दर्शविला आणि पावसाळी अधिवेशनात पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी हा ऐतिहासिक निर्णय जाहीर केला. पशुसंवर्धन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय हा लोकाभिमुख असून असा निर्णय घेणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वांत मोठ्या कृषिप्रधान राज्यांपैकी एक आहे. राज्यातील सुमारे ५५ टक्के लोकसंख्या थेट शेतीवर आणि संबंधित व्यवसायांवर अवलंबून आहे. शेतीसोबतच पशुपालन हे देखील शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे एक अत्यंत महत्त्वाचे अंग आहे.

या निर्णयामुळे राज्यातील सुमारे ७६.४१ लाख पशुपालक कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असून, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मेंढी-शेळीपालन, वराहपालन व तसेच पशुपालनाशी निगडित मूल्यवर्धित प्रकल्प यांसारख्या व्यवसायांना आता कृषी क्षेत्रातीलच सवलती व लाभ मिळणार आहेत.

पशुपालन हे सामाजिक स्थैर्याचेही आधार

भारताची अर्थव्यवस्था कृषिप्रधान असून शेतकरी हा तिचा कणा मानला जातो. भारतीय पशुधन क्षेत्र हे जगातील सर्वात मोठ्या क्षेत्रांपैकी एक आहे, जे भारताच्या ११.६ टक्के पशुधनासह जगाच्या पशुधनात मोठा वाटा उचलते. ग्रामीण भागातील सुमारे ७० टक्के लोकसंख्या शेती व संलग्न व्यवसायांवर अवलंबून आहे, त्यामुळे पशुपालन, कुक्कुटपालन, मेंढी-शेळी पालन यासारखे व्यवसाय केवळ आर्थिक स्रोत नसून सामाजिक स्थैर्याचेही आधार आहेत.

पशुपालनातून मिळणारे नियमित उत्पन्न हे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी महत्त्वाचे ठरते. ज्या भागांमध्ये पशुपालनाचा प्रसार अधिक आहे, तेथे शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण ७९ टक्क्यांनी घटल्याचे निदर्शनास आले आहे. याच कारणास्तव केंद्र सरकारने आत्महत्याग्रस्त भागात एकात्मिक शेती प्रणाली, मत्स्य व पशुपालन पॅकेज लागू केले आहे.



केंद्रीय कुक्कुट संशोधन संस्था (आयसीएआर), च्या संशोधनानुसार, १.२५ हेक्टर जमिनीवर एकात्मिक शेती प्रणालीद्वारे सुमारे ५८,३६० रु. उत्पन्न आणि ५७३ दिवस रोजगार मिळतो. यातूनच शेतीसोबत पशुपालन केल्यास आर्थिक व सामाजिक स्थैर्य साधता येते, हे समोर आले आहे.

कृषी क्षेत्राच्या उत्पन्नात पशुजन्य उत्पन्नाचा २४ टक्के वाटा

महाराष्ट्र हे देशातील तिसऱ्या क्रमाकांचे कृषिप्रधान राज्य आहे. राज्यातील ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीबरोबरच कृषीसंलग्न क्षेत्रे जसे पशुपालन, मत्स्यपालन तसेच फळफळावळ-भाजीपाला उत्पादनासारख्या पूरक क्षेत्रांशी जोडलेली आहे. कृषी हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे, जे राज्याच्या अंदाजे ५० टक्के लोकसंख्येला रोजगार देते. महाराष्ट्रातील कृषीक्षेत्र हे ७-८ टक्के दराने वाढले आहे. महाराष्ट्राचा वार्षिक वाढीचा दर अंदाजे ८-९ टक्के इतका आहे. महाराष्ट्र राज्याचा भारतातील सकल राष्ट्रीय उत्पन्नातील (GDP) वाटा अंदाजे १३ टक्के आहे.

महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने सन २०२८ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलर पर्यंत पोहोचविण्यासाठी पथदर्शी आराखडा अहवाल शासनास सादर केला आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक सल्लागार परिषदेने उत्पन्न वाढीस चालना देऊ शकतील, असे ८ घटक सुनिश्चित केले आहेत. यामध्ये "कृषी व संलग्न" या घटकाचा समावेश आहे. सद्यस्थितीत राज्याच्या सकल उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा १२ टक्के इतका असून कृषी क्षेत्राच्या एकूण उत्पन्नात पशुजन्य उत्पन्नाचा वाटा २४ टक्के इतका आहे. राज्याच्या सकल उत्पन्नात (जीडीपी) अवघ्या सहा जिल्ह्यांचा ५६ टक्के वाटा असून उर्वरित ३० जिल्ह्यांचा वाटा केवळ ४४ टक्के आहे. ही असमतोल स्थिती दूर करण्यासाठी पशुपालन हा आर्थिक समावेशनाचा महत्त्वाचा मार्ग ठरतो.

दुग्ध व्यवसाय, मेंढी-शेळी पालन आणि कुक्कुटपालन या व्यवसायांतून केवळ शेतकरीच नव्हे, तर संबंधित औषध, खाद्य, सेवा पुरवठादार कुटुंबांनाही उपजीविका मिळते. राज्यात १९५ लाख गोवंशीय व म्हशी आहेत, तर सुमारे १ कोटी शेळ्या व २६ लाख मेंढ्या आहेत. हे पशुधन शेकडो कुटुंबांच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कुक्कुटपालनातही राज्य अग्रेसर असून ७.४ कोटी पक्षी नोंदणीकृत आहेत.

सद्य:स्थितीत दूध, अंडी व मांस यांचे उत्पादन व उपलब्धता विचारात घेता सन २०३० पर्यंत दूध, अंडी व मांस यांची एकूण मागणी १७ कोटी टन इतकी असून सदर मागणी तृणधान्याच्या मागणीपेक्षा अधिक आहे. पशुसंवर्धन क्षेत्रामध्ये नियोजनपूर्वक व शास्त्रीय पध्दतीचे व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष होत असल्याकडेही निती आयोगाने लक्ष वेधले असून त्यावर उपाययोजना करुन शेतकऱ्यांची / पशुपालकांची आर्थिक जोखीम कमी करण्याची शिफारस केली आहे. पशुपालकांना भेडसावणाऱ्या कृषी वीज दराच्या तुलनेत जास्त वीज दर, सोलर एनर्जीसाठी अनुदानाचा अभाव, ग्रामपंचायत कर, शेती कर्जाच्या व्याज दराच्या तुलनेत अधिक व्याज दराची आकारणी या अडचणींचे निराकरण झाल्यास पशुपालन व्यवसायाकडे लोकांचा कल वाढून पशुजन्य उत्पादनात वाढ होईल. पशुपालक व्यवसायास प्रोत्साहन देताना कृषी व्यवसायाप्रमाणे सवलती देणे आवश्यक असल्याने पशुपालन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देणे हा महत्वाचा पर्याय होता. त्यामुळेच पशुंसवर्धनाला कृषी समकक्ष दर्जा देण्याची भूमिका पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी मांडली.

पशुपालन व्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा मिळाल्यास होणारे फायदे : कृषी समकक्ष दर्जा : पशुपालन व्यवसाय आता कृषी क्षेत्राशी समकक्ष मानला जाईल.

वीज दरात सवलत : या निर्णयांमध्ये २५ हजार मांसल कुक्कुट पक्षी किंवा ५० हजार अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी क्षमतेच्या तसेच ४५ हजार क्षमतेच्या हॅचरी युनिटच्या कुक्कुटपालन व्यवसायासाठी, १०० दुधाळ जनावरांचे संगोपन, ५०० मेंढी किंवा शेळीपालन आणि २०० वराह या पशुसंवर्धन विषयक व्यवसायासाठी वीज दर आकारणी 'कृषी इतर' या वर्गवारीनुसार न करता कृषी वर्गवारीप्रमाणे करण्यास मान्यता देण्यात आली.

सौर ऊर्जा प्रकल्पासाठी अनुदान : कृषीप्रमाणे कुक्कुटपालन व इतर पशुसंवर्धन व्यवसायासाठी सोलर पंप व इतर सोलार संच उभारण्यास सवलत देण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

कर्जावरील व्याज दरात सवलत : कृषीप्रमाणे पशुपालन व्यवसायास कर्जावरील व्याज दरात सवलत देण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

ग्रामपंचायत करात एकसमानता : पशुपालन व्यवसायास स्वतंत्र व्यवसाय न समजता शेती व्यवसाय समजून ग्रामपंचायत कर दरात एकसमानता आणण्यासाठी, कृषी व्यवसायास ज्या दराने कर आकारणी केली जाते, त्याच दराने कर आकारणी करण्यास मान्यता देण्यात आली.

अंमलबजावणीसाठी निधी : योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यात येणार.

या निर्णयामुळे पशुपालक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात प्रत्यक्ष वाढ होईलच, पण औषध उत्पादक कंपन्या, खाद्य उत्पादक कंपन्या, दूध संकलक आणि प्रक्रिया उद्योग, विक्रेते, वाहतूकदार यांसारख्या अप्रत्यक्षपणे संबंधित व्यवसायांनाही चालना मिळणार आहे. तसेच यामुळे ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होऊन अर्थव्यवस्था बळकट होण्यास मदत होईल.

महाराष्ट्राच्या सर्वांगीण आणि संतुलित विकासासाठी पशुपालन व्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. हे केवळ आर्थिक स्थैर्यासाठीच नव्हे, तर ग्रामीण भागातील गरीबी कमी करण्यासाठी आणि पर्यावरणीय शाश्वतता साधण्यासाठीही आवश्यक ठरणार आहे.

शेती ही केवळ जमीन जोपासण्यापुरती मर्यादित न राहता, ती समग्र ग्रामीण जीवनशैलीचा भाग आहे. पशुपालन हा त्यातील एक अविभाज्य घटक आहे. त्यामुळे पशुपालन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय हा केवळ आर्थिक निर्णय नसून सामाजिक न्याय आणि समावेशक विकासाचा मार्ग आहे. हा दर्जा दिल्यामुळे महाराष्ट्रातील कोट्यवधी पशुपालकांना मुख्य प्रवाहात आणता येईल आणि त्यातून महाराष्ट्रातील दुग्ध उत्पादन, रोजगार निर्मिती, आणि ग्रामीण विकासाला नवे बळ मिळेल, यात शंका नाही.

**"पशुपालनास कृषी समकक्ष दर्जा देणं हा ऐतिहासिक निर्णय असून यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था गतिमान होईल, शाश्वत शेतीला चालना मिळेल, ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होईल आणि शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य वाढेल. राज्यातील सुमारे ७६ लाख कुटुंबे पशुपालन व्यवसायात असून त्यांना याचा थेट लाभ होणार आहे. या निर्णयामुळे राज्यात पशुसंवर्धन क्षेत्रात क्रांती होईल." – पंकजा मुंडे, मंत्री, पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य**

**– नंदकुमार बलभीम वाघमारे**
**वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**मंत्रालय, मुंबई**

◆ पान १ वरून पुढे...

## बीडच्या जनतेच्या...

पूर्णत्वाकडे नेला. रेल्वेचे विद्युतीकरणही लवकरच पूर्ण होईल आणि यामुळे प्रवास अधिक सोयीस्कर आणि वेगाने होईल. असे ते म्हणाले. विकास करत असतांना त्यातुन मार्ग काढावा लागतो, असे सांगुन श्री. पवार म्हणाले, बीड जिल्ह्याच्या विकास कामासाठी निधी कमी पडू देणार नाही. मोठ्या शहरातील रस्ते, मेट्रो, विमानतळ यासारख्या प्रकल्पाकडे लक्ष देत असतांना आमच्या ग्रामीण भागाचासुध्दा विकास झाला पाहिजे या दृष्टीने ग्रामीण भागातही रस्ते, दळणवळणासारख्या पायाभुत सुविधांच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. या रेल्वेच्या माध्यमातून मराठवाड्याच्या विकासाचा, समृध्दीचा नवा अध्याय लिहिला जाईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## "बाप्पा तुम्ही...

शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार बजरंग सोनवणे यांना टोला लगावला. बजरंग सोनवणे तुम्ही भाग्यवान आहात असं म्हणत पंकजा मुंडे यांनी चिमटा काढला. अहिल्यानगर ते बीड रेल्वे सेवेला बुधवारपासून सुरुवात करण्यात आली. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या रेल्वे सेवेचं लोकार्पण करण्यात आलं. यावेळी नेत्यांनी भाषणं केली. मंत्री पंकजा मुंडे यांनीही भाषण करताना सर्वांचे आभार मानले. यासह लोकसभा निवडणूक पराभव करणाऱ्या बजरंग सोनवणे यांच्याबाबतही भाष्य केलं.. मी आदरणीय मुख्यमंत्री साहेबांना म्हटलं की, एकवेळ माझं नाव घेतलं नाही तरी चालेल. पण आमच्या प्रीतम ताईंचे नाव याच्यामध्ये आवर्जून घ्या.

◆ पान १ वरून पुढे...

## मुख्यमंत्री समृद्ध...

असा विश्वास उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांनी व्यक्त केला. बीड तालुक्यातील काकडहिरा येथे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा बुधवारी (दि.१७) शुभारंभ झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अजितदादा पवार हे बोलत होते. व्यासपीठावर श्रीक्षेत्र नारायणगडचे मठाधिपती ह.भ.प. शिवाजी महाराज, माजी कृषीमंत्री आ. धनंजय मुंडे, आ. विक्रम काळे, आ. विजयसिंह पंडित, माजी आमदार संजय दौंड, राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधासनभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, सरपंच प्रीतीताई बागलाने, कल्याण आखाडे, अविनाश नाईकवाडे, राजेश्वर चव्हाण, नारायणगड संस्थानचे विश्वस्त दिलीप भोसले तसेच शासनाचे विविध अधिकारी उपस्थित होते.

## सर्पदंशाने पहिलीत...

कुटुंबीयांच्या लक्षात प्रकार आला. घाबरलेल्या कुटुंबीयांनी तातडीने तिला वडवणी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र तिची प्रकृती गंभीर असल्यामुळे डॉक्टरांनी तिला पुढील उपचारासाठी बीड जिल्हा रुग्णालयात हलवण्याचा सल्ला दिला. रुग्णवाहिकेतून बीडकडे नेत असताना मार्गातच तिची प्राणज्योत मालवली. डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. अचानक घडलेल्या या घटनेने नागरगोजे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

◆ पान १ वरून पुढे...

## खा.सोनवणे म्हणाले...

खा.रजनीताई पाटील, आ.धनंजय मुंडे, आ.विजयसिंह पंडित, आ.नमीता मुंदडा, आ.काळे, माजी.आ.भिमराव धोंडे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, बीड जिल्ह्यातील नागरिकांना रेल्वे येत असल्याचा आज आनंद होत आहे. अंमळनेर ते बीड नवीन रेल्वे मार्गाचे उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ होत असून बीड रेल्वेसाठी कृती समितीने मोठे काम केले. यात नामदेवराव क्षीरसागर, हनुमंत उपरे, अमोल गलधर आदिंसह विविध क्षेत्रात काम करणाऱ्या जनतेने लढा उभा केला. त्याच मागणीचे आज आपण फलीत पाहत आहोत. मागील पन्नास वर्षांपासून आपण रेल्वेची मागणी करत होतो. आज रेल्वेची मागणी आणि स्वप्नही पुर्ण होत आहे. अहिल्यानगर ते परळी अशी रेल्वेची लांबी ही २६१ किलोमिटर आहे. त्यापैकी मार्च २०२४ पर्यंत ९९ किलोमिटर पुर्ण झाली आणि आपल्या कार्यकाळात आजपर्यंत ६७ लांबी पुर्ण झाली. ज्या दिवशी खासदार झालो, त्यानंतर पहिली बैठक रेल्वेची घेतली. तुमच्या सर्वांच्या आर्शीवादाने खासदार झाल्यानंतर मी सालगडी म्हणून काम करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहे.

## आ.सुरेश धस...

यामध्ये परिसरातील तुडुंब भरून वाहिलेल्या विहिरी,तसेच कांदा,बाजरी, सोयाबीन, राजमा,आदी पिकांचे झालेले मोठ्या प्रमाणात नुकसानीची माहिती घेऊन तात्काळ सोबत असलेले कृषी अधिकारी गोरख तरटे यांना जलदगतीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या. त्याच बरोबर.. सुरुडी परिसरातील दोन गावतलाव फुटल्याने शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणावर

◆ पान १ वरून पुढे...

नुकसान झाले असून परिसरातील शेतीतील सुपीक माती वाहून गेले असून त्या ठिकाणी केवळ दगड गोटे राहिलेले आहेत तसेच या परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या विहिरी देखील पूर्णपणे बुजून गेल्या आहेत या दोन्ही तलाव दुरुस्तीचे काम तात्काळ करण्यात यावे याबाबत पाटबंधारे विभागाला सूचना केल्या त्याचबरोबर या भागातील शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यास सुरुवात झाली आहे.ते तातडीने करण्याच्या सूचना दिल्या. खडकवाडी परिसरातील नुकसान झालेल्या कांदा व कापूस पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून सर्व पिके पूर्णपणे पाण्यात गेली असल्याचे विदारक चित्र आहे. तसेच पेठ पांगरा येथील तलाव फुटून परिसरातील शेतकऱ्यांचे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे त्यामुळे तेथील शेतकरी आक्रोश करत असताना आमदार सुरेश धस यांनी त्यांना मदतीचे आश्वासन दिले.तसेच डाग वस्ती जवळून वाहणाऱ्या पांगरा ते कुत्तरवाडी नदीला पूर आल्याने तूर,कांदा या पिकांच मोठे नुकसान तर झालेच शिवाय तर नदीकाठच्या वसंत मिसाळ व पोपट मिसाळ या दोन भावांची राहती घरे पुराच्या पाण्यात वाहून गेली. अतिशय जोरदार झालेले अपर्जन्यवृष्टीमुळे आष्टी ते महिंदा रस्त्यावर असलेल्या सुरुडी नागतळा गावाला जोडणारा पूल पुराच्या पाण्याने पूर्णपणे खचला असून या पुलाची पाहणी करून उपस्थित शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. तसेच धामणगाव शहरातून जाणाऱ्या कडी नदीला आलेल्या पुरामुळे नागरिकांच्या राहत्या घराचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले ज्यामध्ये कुंडलिक कुदळे, मालन ससाणे,रघुनाथ पवार,राहुल पवार, अमोल पवार,कैलास पवार,विलास पवार, जयसिंग पवार,अनिता साळवे,हौसराव शिंदे,प्रमोद शिंदे,भाऊसाहेब शिंदे,दीपक शिंदे,भागवत शिंदे,आशाबाई साबळे यांना प्रत्यक्ष भेटून दिलासा दिला आणि नुकसान भरपाई बाबत आश्वासन दिले.

◆ पान ४ वरून पुढे...

## कार्डियाक कॅथलॅबमुळे....

शल्यचिकित्सक डॉ.संजय राऊत आदीची प्रमुख उपस्थिती होती. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या उपस्थित सर्वांना शुभेच्छा देत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, राज्यातल्या प्रत्येक नागरिकाला आरोग्याच्या सेवा अधिक चांगल्या मिळाव्यात यासाठी आरोग्य सेवेचे सक्षमीकरण करण्यावर अधिक भर देण्यात येत आहे.प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. प्रत्येक ठिकाणी नर्सिंग कॉलेज बरोबरच पॅरामेडिकल स्टाफ,नर्सेस,वैद्यकीय अधिकारीही उपलब्ध करून देण्यात येत आहे.अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय हे आशिया खंडातील पहिले महाविद्यालय असून या महाविद्यालयाच्या अद्यावतीकरणसाठी मुख्य आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले आहे.या कामासाठी ११०० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे.त्याचबरोबर बीड येथील जिल्हा रुग्णालयात नर्सिंग महाविद्यालयासाठी इमारत,मुलींच्या वस्तीगृहासाठीही पोलीस विभागाच्या जागेची पाहणी करण्यात आली असून यासाठी १ हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे. जिल्ह्यातील जनतेच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या असलेल्या या आरोग्य सुविधांची कामे येत्या काळात पूर्ण करण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करण्यात येतील,यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नसल्याची ग्वाही देखील उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी यावेळी दिली. श्री.पवार पुढे म्हणाले की,जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला देण्यात आले असल्याचे सांगत अहिल्यानगर-बीड या रेल्वेचा शुभारंभ आज करण्यात येत आहे.या प्रवासासाठी लागणारा वेळ कमी करण्यासाठी ही रेल्वे विद्युत व्यवस्थेवर चालवण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.भविष्यात ही सेवा पुणे आणि मुंबईपर्यंत घेऊन जात

◆ पान ४ वरून पुढे...

वाहतूक सेवा अधिक दर्जेदार करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील,यासाठी सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त करत क्रीडा संकुलात खेळाडू,नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.लवकरच या कामाची सुरुवात करण्यात येणार आहे.जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी विमानतळ उभारणीसाठी जागेचे सर्व्हेक्षण करण्यात येत असल्याचेही ते म्हणाले. यावेळी उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी कोनशीलेचे अनावरण करून व फीत कापून कार्डियाक कॅथलॅबचे लोकार्पण केले.तसेच संपूर्ण कॅथलॅबची पाहणी करून त्याठिकाणी देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून जाणून घेतली. या कार्यक्रमाला पदाधिकारी, अधिकारी तसेच वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## बीड रेल्वे स्थानकाला...

स्थानकाला लोकनेत्यांचे नाव दिल्यास सामाजिक ध्रुवीकरण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. लोक नेत्यांच्या नावाविषयी मतभेद आहेत परंतु महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाला अद्याप कोणीही विरोध केल्याचे दिसून येत नाही त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाला जिल्हा वासियांची पसंती असल्याचे सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी सांगितले. १७ सप्टेंबर रोजी झालेल्या या आंदोलनावेळी पाली गावचे तलाठी अनिल गायकवाड, मंडळ अधिकारी शीतल चाटे, पोलीस उपनिरीक्षक नितीन काकरवाल, पो. कॉ. दुबाले, बाबर, जायभाय, तसेच आम आदमी पार्टी बीड जिल्हाध्यक्ष अशोक येडे, बीड शहराध्यक्ष सय्यद सादेक, रासप बीड तालुकाध्यक्ष बाबासाहेब सापणकर, रामहरी चाळक अंजनवतीकर आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांची उपस्थिती होती. प्रशासनाने या मागणीसंदर्भात सकारात्मक भूमिका घेतल्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन काही

◆ पान ४ वरून पुढे...

वेळाने स्थगित करण्यात आले. मात्र, जर मागणी पूर्ण न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

## अ‍ॅट्रॉसिटी गुन्ह्यातील...

उपोषणाचा चौथा दिवस आहे आणि गुन्हा दाखल होऊन सोळावा दिवस उजाडला आहे तरीही आरोपीस अटक होत नाही उपोषणकर्ते मुसळधार पावसामध्ये आज चार दिवसापासून उपोषण करत आहेत त्यातील राम साबळे या उपोषणकर्त्याची तब्येत खूप खालावलेली आहे जर का या उपोषणकर्त्याच्या जीविताचे बरे वाईट झाले तर यांस सर्वस्वी शासन आणि प्रशासन जबाबदार असेल म्हणून लवकरात लवकर अ‍ॅट्रॉसिटी गुन्ह्यातील आरोपीस पोलीस प्रशासनाने तात्काळ अटक करावी आणि संबंधित पीडितेस आणि उपोषणकर्त्यास न्याय द्यावा नसता लवकरच लोकशाही मार्गाने लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेच्या वतीने महाराष्ट्रभर तिव्रस्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा या निवेदनाच्या माध्यमातून शासन आणि प्रशासन देत आहोत याची दक्षता घ्यावी असा इशारा लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेचे जिल्हाध्यक्ष दादाराव रोकडे रविंद्र पाटोळे राजन सुतार विलास गुंजाळ जालिंदर कासार अदिंनी निवेदनाद्वारे दिला आहे.

## सरस्वती नदीला...

व लेंढी नदी काठावर असलेल्या या शेतीत नदीच्या महापुराचा सततचा धोका या शेतकऱ्यांना बसत आहे. २०१६,२०२१ व यंदा २०२५ साली आलेल्या महापुरात कापसाचे हातात तोंडाशी आलेले पीक वाहून गेले आहे. कष्ट व आर्थिक भुदरड सोसत पिकावर केलेला खर्च मातीत मिसळला असल्याने शेतकऱ्यात चिंतेचे वातावरण आहे. महापुरातील पाणी शेतातून वाट काढत कापसाच्या पीकाची नासाडी करत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.पीकासोबत पशुधनासाठी ठेवलेला पशुचारा,

◆ पान ४ वरून पुढे...

शेती अवजारे, सोलार प्लेट या महापुरात वाहून गेल्या आसुन शासनाने आर्थिक मदत करण्याची मागणी सदर शेतकरी करत आहेत.

## सांडसचिंचोलीला....

तुडूंब भरून वाहत असल्याने सांडसचिंचोली गावाला पुराचा वेढा पडला आहे. गेल्या तीन दिवसांपासून या गावाला हा पुराचा वेढा असून गावचा संपर्क पुर्णत: तुटला आहे. आपत्कालीन परिस्थितीवर प्रशासन लक्ष ठेवून आहे. अधिकारी गावकऱ्यांशी संपर्क ठेवत आहेत. यापुर्वी इ.स. १९९१ व २००५ साली आपत्कालीन परिस्थितीमध्ये लष्कराच्या सहाय्याने येथील लोकांसाठी मदतकार्य राबवण्यात आले होते. सध्याची स्थिती ही अत्यंत बिकट असून गावकऱ्यांनी सतर्क राहण्याबाबत तहसीलदारांकडून आवाहन करण्यात आले आहे.

## मराठवाडा मुक्ती...

झाले. त्यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती देत समाजाने शिक्षण,आरोग्य, रोजगार याकडे अधिक लक्ष द्यावे, शासन सर्वतोपरी पाठबळ देईल असे आश्वासन दिले.या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी भटके विमुक्त विकास परिषद बीड जिल्हा अभियान प्रमुख बबनजी गिरी यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाला उपस्थित राहून समाजबांधवांना मार्गदर्शन करणाऱ्यांमध्ये गोरे सर, नगरसेवक सतीश घोलप, शिवाजी जाधव, महामुनी, संदीप सोनवणे, विकास जाधव, बंडुशेठ कांकरीया, सागर वाघ यांच्यासह इतर मान्यवरांचा समावेश होता.समाजातील नागरिकांना मिळालेल्या जातीच्या दाखल्यामुळे भविष्यात शैक्षणिक प्रवेश, नोकरी व इतर शासकीय योजनांचा लाभ घेणे सुलभ होणार आहे. या शिबिरामुळे मस्कानजोगी समाजामध्ये आनंदाचे वातावरण असून, समाजाने शासनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना' चा किनगाव येथे राज्यस्तरीय शुभारंभ

# 1 कोटी लाडक्या बहिणींना लखपती दीदी बनवणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

प्रत्येक गावात जिल्हा बँकेमार्फत लाडक्या बहिणींना बिनव्याजी एक लाख रुपयांचे कर्ज देऊन त्यांना शासन आर्थिक पाठबळ देईल. त्यातून उद्योग व्यवसाय करुन त्या स्वावलंबी होतील. राज्यातील एक कोटी लाडक्या बहिणींना लखपती दीदी करण्याचा संकल्प असल्याचा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केला.

महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना' चा राज्यस्तरीय शुभारंभ आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील किनगाव (ता. फुलंब्री) येथे झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस आणि मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये दि.१७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' राबविले जाणार आहे. किनगाव येथील देवगिरी सहकारी साखर कारखान्याच्या आवारात आयोजित या सोहळ्यास राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, खासदार डॉ. कल्याण काळे आणि संदीपान भुमरे, आमदार सर्वश्री संजय केणेकर, प्रशांत बंब, रमेश बोरनारे, आमदार श्रीमती अनुराधा चव्हाण, आमदार श्रीमती संजना जाधव तसेच ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, मल्लिनाथ कलशेट्टी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, तसेच आदर्श गाव हिवरेबाजारचे सरपंच पोपटराव पवार, सरपंच परिषदेचे अध्यक्ष दत्ता काकडे, पाणी फाऊंडेशनचे अविनाश पोळ आदी मान्यवर उपस्थित होते.



*थोर समाजसुधारक केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीदिनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विनम्र अभिवादन केले. छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.*

लोकसहभाग अभियानाचा गाभा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला उपस्थितांना मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या. मराठवाड्याची दुष्काळापासूनही मुक्ती करु असा निर्धार व्यक्त करुन श्री. फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान हे योजनांची अंमलबजावणी करुन लाभ देण्याचे अभियान तर आहेच, मात्र हे प्रत्येक ग्रामस्थाला स्वाभिमानाने जगायला शिकवणारे अभियान आहे. लोकसहभाग या अभियानाचा मूळ गाभा आहे.

लाडक्या बहि ींना उद्योग व्यवसायासाठी अर्थसहाय्य: श्री. फडणवीस म्हणाले की, आमच्या लाडक्या बहिणी यांना केवळ १५०० रुपयांवर अवलंबून रहावे लागू नये, त्यांना महिला बचत गटांच्या माध्यमातून उद्योग व्यवसायासाठी अर्थसहाय्य देऊन लाडक्या बहिणींना सक्षम करण्यात येईल. प्रत्येक गावात लाडक्या बहिणींची एक पतसंस्था सुरु करुन जिल्हा बँकेमार्फत त्यांना १ लाख रुपयांचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध करुन त्यांच्या पाठीशी शासन उभे राहील. अशाप्रकारे राज्यातील एक कोटी लाडक्या बहिणींना लखपती दिदी बनवणार, असा संकल्प मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

## माहिती अधिकार महासंघाचे राज्यव्यापी अधिवेशन सोलापूर येथे संपन्न; उत्कृष्ट कार्यकर्ता म्हणून डॉ.गणेश ढवळे सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**



माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (फेडरेशन) ही महाराष्ट्रातील जागरूक नागरिक व माहिती अधिकार कार्यकर्त्यांची सर्वात मोठी संघटना असून, महासंघाचे राज्यव्यापी अधिवेशन दि.१४ सप्टेंबर रोजी शिवछत्रपती रंगभवन, सोलापूर येथे मोठ्या थाटामाटात संपन्न झाले. या अधिवेशनासाठी राज्यातील ३५ जिल्ह्यांतील शेकडो कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली होती. अधिवेशनाचे उद्घाटन नाशिकचे सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते व निर्भय महाराष्ट्र पार्टीचे संस्थापक अध्यक्ष जितेंद्र भावे यांच्या हस्ते डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन व दिप प्रज्वलीत करून करण्यात आले. शासन व प्रशासन भ्रष्टाचारमुक्त व पारदर्शक करण्यासाठी संघर्ष करणे, तसेच निर्भयपणे लढा उभारण्याचे आवाहन त्यांनी या प्रसंगी कार्यकर्त्यांना केले. महासंघाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी शासनाच्या विभागातील अनेक ज्वलंत प्रश्नांवर त्याचप्रमाणे कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल करण्यात येत असल्याबाबत चर्चा करण्यात आली.कारवयकरत्यावर होत असलेले हल्ले, खोट्या केसेस तसेच अन्याय होईल तिथे आपली एकजूट दाखवून लढा द्यावा.असे प्रतिपादन केले. या अधिवेशनात विविध सामाजिक विषयांवरील अनोख्या आंदोलनांच्या माध्यमातून सामान्यांचे प्रश्न सोडविणाऱ्या बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता व मुख्य प्रचार प्रमुख डॉ.गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांना उद्घाटक जितेंद्र भावे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह प्रदान करून विशेष सन्मान करण्यात आला.यावेळी माहिती अधिकार कार्यकर्ते हरिओम क्षीरसागर, जावेद सिद्दीकी आदी मान्यवर उपस्थित होते.या अधिवेशनात महाराष्ट्र राज्यातील मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

## कपिलधारवाडी येथे भूस्खलनाचा धोका; संरक्षण भिंत कोसळली ग्रामस्थांच्या सुरक्षिततेसाठी तातडीची उपाययोजना करा

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील कपिलधारवाडी (ग्रामपंचायत पाली) येथे मुसळधार पावसामुळे भूस्खलनाचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. गावातील संरक्षण भिंत कोसळली असून रस्ताही खचत चालल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

१३ सप्टेंबरपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे डोंगराच्या कुशीत वसलेल्या या गावातील संरक्षण भिंत उद्ध्वस्त झाली आहे. एवढेच नव्हे तर गावाशी जोडणारा रस्ता खचल्याने ग्रामस्थांची वाहतूक व दैनंदिन काम काजात मोठी गैरसोय होत आहे.



ग्रामस्थांनी यापूर्वी अनेक वेळा शासनाकडे तातडीच्या उपाययोजनांची मागणी केली होती. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. परिणामी, सध्या परिस्थिती अत्यंत गंभीर बनली असून ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तातडीने लक्ष घालून जीवितहानी टाळावी अशी मागणी केली आहे

ग्रामस्थांची ठाम मागणी– तातडीने संरक्षण भिंतीची दुरुस्ती करून सुरक्षितता सुनिश्चित करावी.

शासनस्तरावर ठोस प्रस्ताव सादर करून भविष्यातील धोका टाळावा. झालेल्या हानीबाबत पंचनामे करून तातडीची आर्थिक मदत द्यावी.

ग्रामस्थांचे आवाहन– ग्रामस्थांच्या जीवितास कोणताही धोका होऊ नये म्हणून प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, अन्यथा गंभीर परिणामांना सामोरे जावे लागू शकते, असे गावकऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

## सौ.के.एस.के.महाविद्यालयात मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा

**बीड । प्रतिनिधी**



सौ. के. एस. के. महाविद्यालयाच्या प्रांगणात १७ सप्टेंबर २०२५ रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त ध्वजारोहणाच्या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर व प्रमुख अतिथी म्हणून प्रशासकीय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे,डॉ.विश्वांभर देशमाने यांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी कॅप्टन डॉ.बालासाहेब पोटे यांच्या नेतृत्वात एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यां मार्फत गार्ड ऑफ ऑनर देण्यात आले. हा दिन दरवर्षी साजरा केला जातो.या वर्षी १९४८ मराठवाड्यातील निजामाची सत्ता संपली व मराठवाडा स्वातंत्र्य झाला.म्हणून हा दिन दरवर्षी साजरा करण्यात येतो.तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी सशस्त्र पोलीस कार्यवाही करून निजामाला शरण आणले.हैद्राबाद संस्थान भारतात विलीन करून लोकशाही मान्य करा अशी हाक स्वामी रामानंद तीर्थ यांनी दिली याचा परिणाम होऊन लोक संग्रामात सहभागी झाले आणि मराठवाडा स्वातंत्र्य झाला.

दिनांक २२ ऑगस्ट २०२५ रोजी फीट इंडिया मिशन अंतर्गत ५ किमी मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.या स्पर्धेत पारितोषिक मिळालेल्या विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देवून सन्मानित करण्यात आले.यामध्ये मुली प्रथम श्वेता किसन रांजवण,द्वितीय कोमल दिनकर राठोड, तृतीय श्रुती श्रवण थोरात, मुले प्रथम शुभम सदाशिव चव्हाण, द्वितीय ओम अंकुश नहिराळे,तृतीय बालाजी मारोती बहिरवाल यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या वतीने भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ.अनिता शिंदे, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ.खान ए.एस., कमवि उपप्राचार्य एन.आर.काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर, डॉ.भागचंद सानप, एनसीसी कॅप्टन डॉ.बालासाहेब पोटे, आदि उपस्थित होते. यावेळी संगीत विभागा तर्फे राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत गायन डॉ.राहूल सोनवणे, प्रा.दीपक जमधाडे, प्रा.सुरेश थोरात, प्रा.इंद्रजीत भांगे व संगीत विभागातील विद्यार्थी यांनी केले.या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी ,विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

## न्यू हायस्कूलमध्ये मुक्ती संग्राम दिन साजरा

**बीड । प्रतिनिधी**

दि.१७ सप्टेंबर रोजी म.शि. प्र.मंडळ संचलित,न्यू हायस्कूल गेवराई शाळेत मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष: श्री. निलेश बेदरे साहेब. (शालेय समिती सदस्य). प्रमुख उपस्थिती: श्री.संतोष सुतार साहेब (शालेय समिती सदस्य) श्री.शेख सादिक (शालेय समिती सदस्य) तसेच शाळेचे आ. मुख्याध्यापक डॉ. चव्हाण सर, पर्यवेक्षक पुजदेकर सर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.निलेश बेदरे साहेब व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेच पूजन करून अध्यक्षांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजारोहण



करण्यात आले. त्यानंतर आ. मुख्याध्यापक डॉ चव्हाण सर यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मराठवाडा मुक्ती संग्रामाची पार्श्वभूमी विशद केली . त्याच बरोबर कार्यक्रमाचे अध्यक्ष व मान्यवरांचे शाळेच्या वतीने पुष्पगुच्छ, शाल देऊन स्वागत करण्यात आले. डॉ. चव्हाण सरांच्या संकल्पनेतून, स्पंदन अनियत कालिक भित्तीपत्रक व या सदराखाली कु. प्रांजली राखुंडे व कु. कोमल गव्हाणे यांच्या भित्तिपत्रकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

## सोमवारी ह.भ.प.रामेश्वर महाराज जाधव यांची प्रवचन सेवा

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहरातील बार्शी रोड वरील स्वराज्य नगर येथील रहिवाशी व बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कीर्तनकार, ह.भ.प. माधव महाराज डाके यांच्या माऊली निवास्थानी प्रतीवर्षा प्रमाणे यावर्षी ही चातुर्मास उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे, आषाढी एकादशी ते कार्तिक एकादशी या चार महिन्यांच्या पवित्र पर्वकाळात प्रती सोमवारी रात्री ८ ते ९ यावेळेत विविध ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रेमी महाराज मंडळींची श्री ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा संपन्न होत आहे. या चातुर्मास उत्सवा निम्मित सोमवार दिनांक २२/९/२५ रोजी रात्री ८ते९ या वेळेत ह भ प. संगीत (मृदंग)विशारद, रामेश्वर महाराज जाधव यांची प्रवचन सेवा होणार आहे. सदरील प्रवचन सेवेचे थेट प्रक्षेपण माधव महाराज डाके काठवडेकर या फेसबुक अकाऊंट वरून होणारअसून, या चातुर्मास उत्सवात आपण सर्वांनी सहभागी होऊन श्री ज्ञानेश्वरी प्रवचन श्रवणनाच लाभ घ्यावा असे आवाहन ह भ प माधव महाराज डाके यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## रेल्वे प्रवाशांचा मार्ग धोकादायक! – धानोरा रस्त्यासाठी तातडीची कार्यवाही हवी

### नगरसेवक रंजीत बनसोडे यांची उपमुख्यमंत्र्यांकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील महत्त्वाचा समजला जाणारा धानोरा रस्ता गेल्या काही काळापासून पूर्णतः जर्जर अवस्थेत असून, नागरिकांना रोजच्या प्रवासात प्रचंड अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याच पार्श्वभूमीवर नगरसेवक रणजीत बनसोडे यांनी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे रस्त्याच्या बांधकामासाठी अधिकृत निवेदन सादर केले.

नगरसेवक बनसोडे यांनी स्पष्ट केले की, धानोरा रस्ता हा बीड



शहराला पालवन धानोरा आणि इतर गावांशी जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. आजपासून रेल्वे प्रवासासाठीही याच मार्गाचा वापर होणार आहे, त्यामुळे या रस्त्याची दुरवस्था ही संपूर्ण शहरासाठी चिंता बनली आहे.

रोज हजारो नागरिक या रस्त्यावरून प्रवास करतात आणि त्यांना मोठ्या खड्ड्यांतून वाट काढावी लागते. यामुळे अपघातांची शक्यता वाढली आहे, तर स्थानिक व्यावसायिकांनाही याचा फटका बसतो आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जर या प्रकल्पाकडे लक्ष दिले, तर कामाला तात्काळ गती मिळेल, असा विश्वास नगरसेवक रणजीत बनसोडे यांनी व्यक्त केला आहे.

शहरातील नागरिकांनी देखील या मागणीचे जोरदार समर्थन करत लवकरात लवकर रस्ता बांधकामाचे काम सुरू व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.





*मराठवाडा मुक्ती दिन निमित्त आज दि.१७-०९-२०२५ रोजी शिवणी येथे मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड अंतर्गत जि.प.प्राथमिक शाळा भिल्लवस्ती येथे सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.या मध्ये(सर्व विद्यार्थ्यांना, स्कूल बॅग, वही, पेन, पेन्सिल) वाटप करण्यात आले. या वेळी उपस्थित मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे उपाध्यक्ष विशाल नाना डोळस, सचिव तेजस दिलीप पवार, सहसचिव रोहन डोळस, व सर्व सदस्य,जि.प.प्राथमिक शाळेचे प्राचार्य उद्धव खरात सर, सुरेश डोळस शिक्षक,दत्त सारूक सर, शिवणी गावचे सरपंच अजय सुपेकर सर, व मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते.*



## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते स्वस्थ नारी, सशक्त परिवार राष्ट्रीय अभियानाचा शुभारंभ

### स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान आरोग्य यंत्रणेने यशस्वीपणे राबवावे : पालकमंत्री अतुल सावे

**नांदेड । प्रतिनिधी**

स्वस्थ नारी, सशक्त परिवार या राष्ट्रीय अभियानाचा राष्ट्रीय शुभारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मध्यप्रदेश राज्यातील धार येथून आज करण्यात आला. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण येथील जिल्हा नियोजन भवन सभागृहात दूरदृश्यप्रणालीद्वारे दाखविण्यात आले. या निमित्ताने नांदेड जिल्हास्तरावरील स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानाचे उद्घाटन पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते जिल्हा नियोजन भवन येथे पार पडले. महिलांच्या आरोग्यासाठी आरोग्य यंत्रणेतील सर्व टिमने स्वस्थ नारी सशक्त परिवार हे अभियान यशस्वीपणे राबवावे, अशी सूचना पालकमंत्री अतुल सावे यांनी केली.

या कार्यक्रमास राज्यसभा सदस्य तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार आनंदराव तिडके, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, सहाय्यक जिल्हाधिकारी अनन्या रेड्डी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगिता देशमुख यांच्यासह आरोग्य विभागाचे अधिकारी-कर्मचारी, महिला, नागरिक आदींची उपस्थिती होती.

या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांची तज्ज्ञ डॉक्टारांकडून मोफत आरोग्य तपासणी, समुपदेशन, उपचार केले जाणार आहे. कार्यक्रमात अवयवदानाची शपथ देण्यात आली. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांनी आरोग्य शिबिराबाबत माहिती देऊन आरोग्य शिबिराचा जिल्ह्यातील महिला लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

आज स्त्री रुग्णालय श्याम नगर नांदेड आणि उपजिल्हा रुग्णालय मुखेड येथे झालेल्या आरोग्य शिबिरात १ हजार १७५ महिला लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तर २४ नागरिकांनी रक्तदान केले आहे. अशी माहिती आरोग्य यंत्रणेकडून देण्यात आली. शेवटी स्त्री रुग्णालयाच्या वैद्यकिय अधिक्षक डॉ. मनुरकर यांनी आभार मानले.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● गुरूवार, दि. १८ सप्टेंबर २०२५ ● पान ४

# कार्डियाक कॅथलॅबमुळे गोरगरिबांना आरोग्याच्या सेवा अधिक दर्जेदारपणे मिळतील : उपमुख्यमंत्री अजित पवार

बीड । प्रतिनिधी

शहरी व ग्रामीण भागातील जनतेला पायाभूत सुविधांबरोबरच आरोग्याच्या सेवा अधिक चांगल्या पद्धतीने देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. जिल्हा रुग्णालयातील कार्डियाक कॅथलॅबमुळे गोरगरीब रुग्णांना आरोग्याच्या सेवा अधिक दर्जेदारपणे उपलब्ध होणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी केले.कॅथलॅबसाठी आवश्यकता भासल्यास अधिकचा निधी मंजूर करू,अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. बीड येथील जिल्हा रुग्णालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते १८ कोटी ७२ लक्ष रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक कार्डियाक कॅथलॅबचे लोकार्पण श्री. पवार यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार विक्रम काळे, आमदार संदीप क्षीरसागर, डॉ.योगेश क्षीरसागर , उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन ,जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, आरोग्य सेवेच्या उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड, जिल्हा



### ● असे आहे कार्डियाक कॅथलॅब

सर्वसामान्यांच्यादृष्टीने महत्वपूर्ण अशा कॅथलॅबमध्ये २४ तास कार्यरत कार्डिओलॉजीस्ट व भूलतज्ञ व डॉक्टर उपस्थित राहणार आहेत. कॅथलॅबमध्ये अॅन्जीओग्राफी, अॅन्जीओप्लासटी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. कॅथलॅबमध्ये १० बेडचे सुसज्य आय. सी.यू.असून कार्डियाक इको कार्डियोग्राफीची सोय करण्यात आली आहे.सुसज्य असे शस्त्रक्रिया गृह तयार करण्यात आलेले असून भविष्यात याच ठिकाणी ओपण हार्ट सर्जरीची सुविधाही उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावासाठी जलसमाधी आंदोलन

## प्रशासनाच्या आश्वासनानंतर आंदोलन तुर्तास स्थगित : बाळासाहेब मोरे पाटील

बीड । प्रतिनिधी

बीड रेल्वे स्थानकाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी शिवशक्ती भीमशक्ती विचार मंचच्या वतीने पाली येथील बिंदुसरा धरणात जलसमाधी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व मंचाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांनी केले. प्रशासनाकडून ठोस लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन काही काळाने स्थगित करण्यात आले. दि.१७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर बीड ते अहिल्यानगर रेल्वेगाडीला मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात येणार आहे. मात्र, बीड रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याची मागणी दीर्घकाळापासून प्रलंबित आहे. ही मागणी लवकरात लवकर मान्य व्हावी, यासाठी पाली येथील बिंदुसरा धरणात जलसमाधी आंदोलन छेडण्यात आले. रेल्वे



▶▶ उर्वरित पान २ वर

# अॅट्रॉसिटी गुन्ह्यातील आरोपीस तात्काळ अटक करा

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशनच्या हाद्दीतील तळवट बोरगाव येथील महिला अत्याचार तलवाडा पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यातील आरोपीला पोलीस प्रशासनाकडुन पाठीशी घातल्या जात आसल्याने आरोपीस अटक करण्यात यावी या.आणुषंगाने पोलीस प्रशासनास लहुजी साळवे क्रांती सेनेच्या वतीने निवेदन देण्यात आले असुन त्यामध्ये म्हण्टले आहे की तळवट बोरगाव तालुका गेवराई जिल्हा बीड येथे दि. ३ सप्टेंबर रोजी आरोपी सोमनाथ गाडे हा गावातीलच कल्पना लंकेश लोणके या अनुसूचित जातीतील महिलेच्या त्याच्या शेतातील कामाच्या कारणावरून जबरदस्तीने घरात शिरला आणि तिचा वाईट हेतूने हात धरून तिला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याप्रकरणी तलवडा पोलीस स्टेशन मध्ये अॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल झालेला आहे या आरोपीस पोलिसांनी अटक करावे यामागणीसाठी तलवाडा येथील मातंग समाजाच्या वतीने तिन उपोषणकर्ते दिनांक १३ सप्टेंबर रोजी पासून आमरण उपोषणास बसले आहेत आज

▶▶ उर्वरित पान २ वर

# सांडसचिंचोलीला बेटाचे स्वरुप तीन दिवसांपासून गावाला पाण्याचा विळखा, संपर्क तुटलेलाच

माजलगाव । प्रतिनिधी

गेल्या तीन दिवसांपासून बीड जिल्ह्यात पावसाने हाहाकार उडवून दिल्याने जिल्हाभरातल्या छोट्या-मोठ्या नद्या ओव्हरफूल वाहत आहेत. याचा फटका हजारो हेक्टर शेतीला एकीकडे बसला असताना दुसरीकडे माजलगाव तालुक्यातल्या सांडसचिंचोली हे गाव गेल्या दिवसांपासून पाण्याच्या विळख्यात अडकले आहे. या तीन दिवसांच्या कालखंडात दीड हजार लोकसंख्या असलेल्या या गावातून एकही व्यक्ती गावाबाहेर



पडू शकला नाही. या गावाला सिंधफणा आणि गोदावरी नदीने विळखा घातल्याने हे गाव एखाद्या बेटासारखे दिसत आहे. माजलगाव तालुक्यातील सांडसचिंचोली हे गाव दीड हजार लोकवस्तीचे आहे. या गावास खेटून सिंधफणा नदी वाहते व ती पुढे जावून मंजरथ येथे गोदावरी नदीस मिळते. सध्या सिंधफणा नदी पात्रात ८५ हजार क्युसेस पेक्षा जास्त विसर्ग असल्याने ती काठोकाठ भरून वाहत आहे तर गोदावरी नदी

▶▶ उर्वरित पान २ वर

## सरस्वती नदीला आलेल्या महापुरामुळे शेतकऱ्याचा हाताशी आलेला घास हिरावला

दिंद्रुड । प्रतिनिधी

गेल्या नऊ वर्षात दिंद्रुड च्या सरस्वती नदीला तीनदा महापूर आला. या पुराचे पाणी शेतात शिरले अन२ पिकांचे होत्याचे नव्हते झाले. ही आपबिती आहे माजलगाव तालुक्यातील नाकलगाव च्या शेतकऱ्यांची. येथील शेतकरी राजू अशोक झोडगे, शिवाजी मुंजाबा झोडगे, सत्य प्रेम मुंजाबा झोडगे यांचे दिंद्रुड महसूल मंडळातील नाकलगाव शिवारात अनुक्रमे गट नंबर १५६,१५५, १५७, १५८ मध्ये ४ हेक्टर ८० आर शेतजमीन आहे. सरस्वती ▶▶ उर्वरित पान २ वर

# वासनवाडीच्या पाझर तलावाला भगदाड पडले

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात मागील तीन दिवसापासून पाऊस पडत आहे. कालच्या मुसळधार पावसाने तर सर्वत्र पाणीच पाणी झाले. अनेक नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली. जे तलाव भरले नव्हते ते कालच्या पावसात पुर्ण...त भरले. जिल्ह्यातील लहान मोठे २९ तलाव १०० टक्के भरले आहेत. बीड पासून काही अंतरावर असलेल्या



वासनवाडी येथील तलावाला सकाळी भगदाड पडल्याने मोठ्या प्रमाणात पाणी वाहू लागले. यामुळे परिसरातील शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. बीड जिल्ह्यात काल मुसळधार पाऊस पडला. या मुसळधार पावसामुळे सर्वत्र हाहाकार उडाला होता. अनेक नद्या ओसांडून वाहू लागल्या.

काही नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली. जे तलाव पुर्वीच्या पावसात भरले नव्हे ते कालच्या पावसाने भरले आहेत. बीड जिल्ह्यातील लहान मोठे २९ तलाव १०० टक्के भरले आहेत. बीड पासून काही अंतरावर असलेल्या वासनवाडी येथील पाझर तलाव पुर्णत... भरल्याने या तलावाला आज सकाळी भगदाड पडले असून त्यातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग होत आहे. या पाण्यामुळे तलावाखालील शेतीचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे.

## असरडोह, रूई धारूर येथील ही तलाव फुटले

धारूर तालुक्याती आसरडोह आणि रूई धारूर येथील पाझर तलाव फुटले आहे. या तलावाखाली असलेले सात ते आठ पुल वाहून गेले असल्याचे सांगण्यात आले आहे. कालच्या या पावसाने शेतीसह इतरही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त पाटोद्यात मस्कानजोगी समाजाला जातीय प्रमाणपत्र वाटप

पाटोदा । प्रतिनिधी

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून पाटोदा तालुक्यातील मस्कानजोगी वस्ती येथे एक भव्य शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिराचे आयोजन राजे छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान तसेच राजे उमाजी नाईक कागदपत्र अभियान या शासनमान्य उपक्रम ंतर्गत करण्यात आले होते.या विशेष शिबिराचे आयोजन



भटके विमुक्त विकास परिषद, महाराष्ट्र प्रदेश यांच्या पुढाकाराने तसेच बीड जिल्हा अभियान प्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.या उपक्रमांतर्गत वस्तीतील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा, त्यांच्याकडे आवश्यक कागदपत्रांची कमतरता भासू नये यासाठी आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, रेशन कार्ड, जातीचे प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रांचे वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे अनेक वर्षांपासून जातीच्या प्रमाणपत्रासाठी भटकंती करणाऱ्या मस्कानजोगी समाजातील कुटुंबांना या शिबिरामध्ये अधिकृत जातीचे दाखले मिळाले. त्यामुळे समाजबांधवांमध्ये मोठा उत्साह व समाधानाचे वातावरण होते.

शिबिराचे उद्घाटन व मार्गदर्शन पाटोदा उपविभागीय अधिकारी तसेच तहसीलदार साहेब यांच्या हस्ते ▶▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान ; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बीड येथून उपस्थिती

बीड । प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने महिलांच्या आरोग्याचा आणि त्यांच्या सक्षमीकरणांचा विचार करुन सशक्त नारी, सशक्त परिवार या अभियानाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज मध्यप्रदेशातील धार येथुन करण्यात आले. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीड येथुन ऑनलाईन पध्दतीने आपली उपस्थिती दर्शविली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे, खासदार रजनी पाटील, खासदार बजरंग सोनवणे, आमदार सर्वश्री विक्रम काळे, धनंजय मुंडे, विजयसिंह पंडित, आमदार श्रीमती नमिता मुंदडा, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आदी उपस्थित होते.

### पुलावर गाडी धडकली, दोघे ठार

केज । प्रतिनिधी

केज रस्त्यावर पुलावर चारचाकी गाडी धडकल्याने या अपघातात गाडीमधील दोघे जण गंभीररित्या जखमी होवून ठार झाल्याची घटना आज सकाळी घडली आहे. केज शहरापासून सात किमी अंतरावर सावंतवाडीजवळ आज सकाळी एक चार चाकी गाडीपुलावर धडकली यामध्ये गाडीतील इम्रान कच्ची (वय ५०) व अजरोद्दीन शेख (वय ४० रा.दोघे परळी) हे दोघे गंभीररित्या जखमी होवून ठार झाले आहेत.

### प्राध्यापकांचे सशक्त भविष्य घडविण्यासाठी महासंघ कटिबद्ध: प्रा. डॉ. प्रदीप खेडकर



बीड । प्रतिनिधी

अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाचे राष्ट्रीय सचिव व महाराष्ट्र प्रांताध्यक्ष प्रा. डॉ. प्रदीप खेडकर आणि विभागीय अध्यक्ष प्रा. डॉ. दिलीप अर्जुने यांच्या उपस्थितीत बीड येथे स्नेह बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीचे आयोजन प्रा. डॉ. गणेश आडगावकर यांच्या निवासस्थानी करण्यात आले होते. यावेळी बोलतांना प्रा. प्रदीप खेडकर म्हणाले की, आपली संघटना ही काही मेरी मांगे पुरी करो म्हणणारी संघटना नसून, एक विचार आहे. जो विचार सर्व प्राध्यापकांना एका धाग्यात बांधतो तो धागा म्हणजे अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ. आपली संघटना कायम प्राध्यापक आणि प्राध्यापकांचे प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

### पालक मंत्र्यास निवेदन ,बीड रेल्वे स्थानकाचे नामकरण लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे स्थानक व्हावे : गणेश लांडे



बीड । प्रतिनिधी

बीड रेल्वे स्थानकाचे नामकरण लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे स्थानक असे व्हावे अशा आशयाचे निवेदन बीड जिल्हा सरचिटणीस श्री गणेश लांडे यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. अजितदादा पवार यांना दिले. अहिल्यानगर बीड परळी रेल्वे हे लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांचे स्वप्न होते. या रेल्वेमार्गासाठी सर्वाधिक परिश्रम व योगदान गोपीनाथ मुंडें साहेबांचे आहे. त्यांच्या प्रयत्नाशिवाय हा प्रकल्प पूर्ण झाला नसता असे प्रतिपादन गणेश लांडे यांनी केले. मुंडे साहेबांच्या नंतर हा प्रकल्प पूर्णत्वास जाण्यासाठी मा. पंकजाताई मुंडे यांनी पाठपुरावा केला. बीड जिल्हा भाजपा सरचिटणीस श्री.गणेश लांडे बीड रेल्वे स्थानकाचे नामकरण लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे स्थानक व्हावे यासाठी आग्रही असून, मागणी मान्य न झाल्यास त्यासाठी जनआंदोलन उभे करण्यात येईल . कारण ही मागणी जनभावना आहे अशा भावना यावेळी गणेश लांडे यांनी व्यक्त केली या प्रसंगी भाजपा नेते गणेशजी पुजारी उपस्थित होते.

### कुर्ला - माळापुरी रस्त्यावरील पूल अतिवृष्टीमुळे खराब



कुर्ला । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून झालेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे कुर्ला माळापुरी रस्त्यावरील कुर्ला येथील बिंदुसरा नदीवरील पूल खराब झाला आहे. पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे पुलाला धोका निर्माण झाला आहे. या रस्त्याचा वापर कुर्ला तसेच परिसरातील नागरिक दररोज मोठ्या प्रमाणावर करीत असल्यामुळे नागरिकांना आता मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. शाळकरी मुले, शेतकरी तसेच रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवा वाहने या पुलावरून जात असल्यामुळे लवकरात लवकर पुलाची दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. यासंदर्भात स्वराज्य जनजागृती परिषदेचे विश्वस्त श्री. तुषार पाटील यांनी प्रशासनाने तातडीने या पुलाची पाहणी करून लवकरात लवकर दुरुस्तीचे काम हाती घ्यावे, अशी मागणी केली आहे. पुलाची तात्काळ दुरुस्ती न झाल्यास अपघाताचा धोका वाढण्याची शक्यता असल्याचे नागरिकांनीही व्यक्त केले.